झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

क्र.झोपुप्रा/विनि/२०१४/१४५२.
दिनांक : 21 JUN 2014

परिपत्रक क्रं. :- १४६

विषय : विकासकाकडून बँक हमीपत्र किंवा अनामत स्वरुपात बँक हमीपत्राची रक्कम प्राप्त करुन घेण्याबाबत.

संदर्भ : १) मा. मुख्यकार्यकारी अधिकारी/झोपुप्रा यांचेकडील नस्ती क्र. १४६०/SRA मधील आदेश, दि. १२.१२.२००६.
२) झोपुप्रा परिपत्रक क्र. ९६, दि.१३.०४.२००९.
३) झोपुप्रा परिपत्रक क्र. ९७, दि.१३.०४.२००९.
४) झोपुप्रा परिपत्रक क्र.१०१, दि.२०.०७.२००९.

महाराष्ट्र शासनाचे गृहनिर्माण धोरण १ नोव्हेंबर २००६ रोजी प्रसिध्द झाले त्यात बांधकाम व्यवसायिकाचे/विकासकाचे क्रिसील/इक्रा या नामांकित कंपन्याकडून पतमानांकन करण्याचे प्रस्तावीत आहे. मात्र अदयापही परि-३ प्रमाणीत करताना विकासकाची आर्थिक कुवत पडताळण्यासाठी कोणती कार्यपध्दती अवलंबावी याबाबत मार्गदर्शक तत्वे शासन स्तरावरुन निर्गमित न झाल्याने दरम्यानचे कालावधीत DCR ३३ (१०) व ३३ (१४) योजना म्हाडा/शासन/केंद्रशासन/एम.सी.जी.एम./खाजगी जमिनीवर राबविताना परि-३ प्रमाणीत करताना विकासकाकडून २०% बँक हमीपत्र घेण्याचे उपरोक्त संदर्भांकित १ च्या नस्तीमधील टिप्पणीमध्ये दि.१२.१२.२००६ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

संदर्भांकित ३ व ४ च्या परिपत्रकानुसार जागतिक आर्थिक मंदीमूळे बँक हमीपत्राची रक्कम बांधकाम खर्चाच्या २० % वरुन १०% करण्यात आली.

संदर्भांकित ४ च्या परिपत्रकाद्वारे शासकीय/म्हाडा/ एम.सी.जी.एम./ खाजगी जमिनीकरीता विकासकाकडून पुनर्वसन सदनिकांचा विकास करण्यासाठी रु.२,६४,०००/- च्या १०% इतक्या



प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६५६ ५८००, २६५९ ०४०५ / १८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल: info@sra.gov.in

रक्कमेचे बँक हमीपत्र प्राप्त करुन घेऊन, लेखाशाखेमार्फत परिशिष्ट-३ निर्गमित करण्यात येत आहे. सदर बँक हमीपत्राची विधीग्राहयता समाप्त होताच विकासकाने सुधारीत विधीग्राहय बँक हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतु, लेखा शाखेमार्फत विकासकास वारंवार कळवूनही ब-याचश्या प्रकरणी विकासक सुधारीत विधीग्राहय बँक हमीपत्र उपलब्ध करुन देत नाहीत.

यास्तव सदर परिपत्रकाद्वारे खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

१) विकासकास राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेचे पुढील ५ वर्ष कालावधीचे बँक हमीपत्र किंवा तितकीच रक्कम PayOrder/Demand Draft स्वरुपात अनामत म्हणून लेखा शाखेत जमा करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२) Pay Order / D.D. च्या स्वरुपात जमा करण्यात येणा-या रक्कमेवर विकासकास कोणतेही व्याज देय होणार नाही. सदर रक्कम संस्थेस भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित केल्यानंतर विकासकास विना व्याज परत करण्यात येईल.

३) विकासकाने ५ वर्षासाठी बँक हमीपत्र सादर केल्यास, सदरच्या बँक हमीपत्राची विधीग्राहयता पुढील कालावधीसाठी वाढविण्याची जबाबदारी पूर्णपणे विकासकाची राहिल.

४) सुधारीत विधीग्राहय बँक हमीपत्र, बँक हमीपत्राचा विधीग्राहय कालावधी संपण्यापूर्वी एक महिना अगोदर विधीग्राहय/नूतनीकरण करुन प्राप्त न झाल्यास मूळ बँक हमीपत्राची रक्कम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे वर्ग करुन घेण्यात येईल.

५) पुनर्वसन इमारतीचे बांधकाम विकासकाने दिलेल्या मुदत ग्राहय बँक हमीपत्राच्या कालावधीपूर्वी पूर्ण झाल्यास, विकासकाने अभियांत्रिकी शाखेमार्फत भोगवटा प्रमाणपत्र (Occupation Certificate) प्राप्त करुन लेखा शाखेस सादर केल्यास, विकासकाच्या विनंतीनुसार मूळ बँक हमीपत्र संबंधित बँकेस परत करण्यात येईल.

सदर आदेशाची अंमलबजावणी १ जूलै २०१४ पासून करण्यात यावी.

(signature) २/७/१४

मुख्य कार्यकारी अधिकारी /झोपुप्रा

१) मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक

२) सचिव (झोपुप्रा) यांचे स्वीय सहाय्यक

३) वित्त नियंत्रक (झोपुप्रा) यांचे स्वीय सहाय्यक

४) लेखा शाखा

५) उप मुख्य अभियंता (झोपुप्रा)

६) कार्यकारी अभियंता - १,२,३ (झोपुप्रा)

७) उप जिल्हाधिकारी (झोपुप्रा)

८) विधी सल्लागार (झोपुप्रा)

९) सहाय्यक संचालक, नगर रचना

१०) सहाय्यक निबंधक (झोपुप्रा)

११) जनसंपर्क व प्रशासकिय अधिकारी

१२) माहिती व तंत्रज्ञान विभाग (झोपुप्रा)

१३) प्रशासन निवडनस्ती